International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 5 January – February - 2026

# मराठीतील आंबेडकरी गीतांचे योगदान

**सतिश सुदाम कांबळे[1], प्रा. डॉ. प्रतिभा सुरेश जाधव[2]**

[1]*पीएच.डी.संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न, मराठी संशोधन केंद्र म वि प्र समाजाचे, के.टी.एच.एम. महाविद्यालय नाशिक*

[2]*मराठी संशोधन केंद्र मविप्र समाजाचे, के.टी.एच.एम. महाविद्यालय नाशिक*

*Corresponding Author – सतिश सुदाम कांबळे*

**DOI - 10.5281/zenodo.18899344**

***सारांश :***

*कवितेच्या माध्यमातून कवींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश सार्‍या भारतीयांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. आंबेडकरांनी ठराविक समाजाच्या अन्यायाविरुद्ध लढा न उभा करता, समस्त अन्यायग्रस्त लोकांसाठी जीवाची पर्वा न करता लढा उभा केला आहे. हे सांगताना समता, न्याय, बंधुता, स्वातंत्र या मुल्यांचा अवलंब करून सर्वांना समान न्याय दिला. डॉ. आंबेडकरांनी मानवाचाच विचार न करता संपूर्ण रानावनातील पशु पक्षांनाही संरक्षण दिले आहे, हे या गीतातून स्पष्ट होते.*

***संकेत शब्द- समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, विद्रोह, अन्याय, बलात्कार, स्त्रीमुक्ती, आत्मभान, साहित्याचे प्रेरणास्थान, अस्मिता जागृती, उपेक्षित वर्ग, वेदना, व्यथा, वंचना.***

**प्रस्तावना:**

सन 1960 नंतरच्या काळात दलित साहित्य हा वांडमय प्रवाह सुरू झाला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी विविध चळवळींच्या माध्यमातून समाजात जागृती घडवून आणली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समग्र भारतीयांसाठी समाजहिताच्या दृष्टीने कार्य केले आहे. आंबेडकरी गीतांच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांचे विचार सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविले जातात. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीवर वेगवेगळी गीतं लिहिली गेली, त्यातून बाबासाहेबांचे विचार समाजापर्यंत पोहोचले आणि त्यामुळे दलितांना आत्मभान येऊन, ते शिक्षणाकडे वळाले. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी समाजात परिवर्तन घडवून आणले.

**विषय विवेचन:**

डॉ. आंबेडकरांच्या चळवळीने जागृत झालेल्या समग्र समाजाला आत्मभात देण्याचे कार्य आंबेडकरांनी केले. त्यामुळे या समाजात शिक्षणाचा प्रसार झाला आणि त्यातून निर्माण झालेल्या नव्या जाणिवेने दलित लेखक साहित्य लेखन करू लागले. डॉ. आंबेडकरांच्या कार्यांनी आणि विचारांनी दलित समाजाची अस्मिता जागृत झाली, म्हणून डॉ. आंबेडकरांना दलित साहित्याचे प्रेरणास्थान मानले जाते. डॉ. आंबेडकरांचे विचार अनेक गीतकार आपल्या गीतांमधून सादर करतात. दलित समाज हा पूर्वीपासून समाजातील एक उपेक्षित वर्ग राहिला आहे. या समाजाच्या व्यथा, वेदना, विद्रोह, वंचना दलित साहित्यातून अनेक लेखकांनी मांडल्या आहेत, त्याच वेदना गीतांमधून व्यक्त होऊन दलितांना आत्मभान आले.

डॉ. आंबेडकरांचे बहुआयामी विचार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी आंबेडकरी गीते महत्त्वाची ठरतात. या गीतांमधून डॉ. आंबेडकरांचे समतावादी, मानवतावादी विचार करतात. आंबेडकरी गीतांमधून प्रेरणा घेऊन आजही समाजातील अनेक कार्यकर्ते, विचारवंत, अभ्यासक आणि सर्वसामान्य माणूसही आंबेडकरांच्या विचारांना आपल्या गीतामधून उजाळा देण्याचे कार्य करतात. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाबरोबरच दलितेतर समाजासाठी कार्य केलेले आहे. समाजातील घातक प्रथांचा समाजावर होत असलेल्या परिणामाची जाणीव आंबेडकरांनी समाजाला करून दिली. यातूनच अनेक चळवळी निर्माण झाल्या समाज जागृती साठी या चळवळी महत्त्वाच्या ठरल्या. या चळवळी संदर्भात अनेक गीतकारांनी डॉ. आंबेडकरांचे विचार गीतेतून समाजापर्यंत पोहोचविले आहेत.

समाजातील विषमता हा 1980 नंतरच्या कवींचा चिंतनाचा विषय आहे, ही चिंतनशीलताच या कवींचे बळ आहे. 1980 पूर्व कवितेत व साहित्यात बलात्कार, भोगवस्तू, मुले देणारी, चुलीपुढे बसणारी यापलीकडे स्त्रीला स्थान नव्हते. नव्या पिढीने मात्र स्त्रियांना माणूस म्हणून मूल्य देण्याचा प्रयत्न केला आहे. महात्मा फुले, आंबेडकरी विचारधारेने दिलेले हे भान जपण्याचा या कवींनी प्रयत्न तर केलाच आहे, पण तिची शूरताही ते नाकारित नाहीत. स्त्री ही अबला नाही हे सांगण्याचाच हा प्रयत्न असतो. अरुण काळे यांची आई दंगल काळात अख्या वस्तीला एकटी गस्त घालत असते. इथे काही कल्पनेच्या पातळीवरचं अनुभव चित्रण नाही तर तो असतो अस्सल जीवनानुभव! दलित कवितेतील पहिल्या पिढीने पुरुषप्रधान संस्कृती जोपासली. या पुरुषप्रधान संस्कृतीतही कवितेच्या प्रांतात संचार करणाऱ्या हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच कवयित्री आहेत. त्यात सुरेखा भगत, उषा अंभोरे, कुसुम माला, धम्मज्योती कांबळे, संध्या रंगारी, प्रतिभा राजानंद, प्रज्ञा लोखंडे, उषा किरण, आत्राम यांचा अपवाद वगळता बहुतांश; कवयित्रींची कविता ही पुरुषी अनुकरणात अडकून पडलेली आहे. संध्या रंगारी यांची कविता या दृष्टीने बोलकी आहे.

" मी जन्मले
त्यांनी ठरविलेल्या
अस्पृश्य मातेच्या पोटी
कपाळावर रेखाटलेल्या
महारपणाचा वारसा घेऊन स्वतःला जाळत राहिले
पोटाच्या भाकरीला शेकावं म्हणून"१

अशाप्रकारे जातीयतेचे दुःख कवयित्रीने इथे मांडले आहे. या गीतेतून कवयित्री म्हणते माणसाने कोठे जन्म घ्यावा, हे त्याच्या हातात नसते, माझा जन्म एका अस्पृश्य घरात झाला म्हणून मी पोटाची भूक भागवण्यासाठी स्वतःच्या जीवाला जाळत राहिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळी संदर्भात व त्यांच्या जीवनासंदर्भात गीतकारांनी गीते गायली आहेत. काही गीतकारांनी मानव मुक्तीच्या लढ्यासाठी साहित्य लेखन केलेले आहे तर काहींनी आत्मशोध, आत्मभानातून साहित्य निर्मिती केली आहे. काही गीतकारांनी व्यथा, वेदना, नकार यातून साहित्य निर्मिती केलेली दिसते."महात्मा ज्योतिराव फुलेंच्या विचारांचा वारसा बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारला, त्यांनी सामाजिक चळवळ आणि सामाजिक परिवर्तनास तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान दिले. त्यामुळे आंबेडकरांच्या चळवळीत दलित शोषित लोकांचा प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला. डॉ. आंबेडकरांची परिवर्तनाची

चळवळही लोकांची चळवळ बनली. त्यांनी लोकांना परिवर्तनाची नवीन दिशा दाखवली.समाजामध्ये नव्या अशा आकांक्षा रुजविल्या."२

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजाला भोगाव्या लागणाऱ्या व्यथा, वेदना यातून या समाजाची मुक्तता करण्यासाठी अनेक चळवळी उभारल्या, यातून समाजाला स्वाभिमानाने जगण्याचे भान आले. हे आंबेडकरी गीतांमधून स्पष्ट करण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेगवेगळ्या चळवळींच्या माध्यमाने बहुजनांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली. मानव मुक्तीसाठी त्यांनी लढा दिला. डॉक्टर आंबेडकरांच्या या कार्याला गीतांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य काही गीतकारांनी केलेले आहे.यात लोक शाहीर वामनदादा कर्डक कवी रंगराज ( विष्णु) ढेंगळे, कवी पी. कुमार धनविजय, राजा ढाले, ठाकूर भगवान, भीमसेन देठे, शरद म्हातेकर, शशिकांत हिंगोलीकर, विनय कटारे, ॲड. हरिहर बोरकर, लोकनाथ यशवंत, भाऊ फक्कड, पट्टे बापूराव, भीमराव कर्डक, शाहीर केरुजी घेगडे, राजा नंदगड, पहिले दिनबधू, शेगावकर श्रीधर, रमेश मोहोळ, चिटणीस, आण्णाभाऊ साठे, लोकशाहीर विठ्ठल उमप, नामदेव ढसाळ, वसंत बापट, केशव मेश्राम, अरुण कांबळे, वामन निंबाळकर, अर्जुन डांगळे, सुखराम हिवराळे, मंगेश पाडगावकर, प्रल्हाद चेंदवणकर, घनश्याम जमदाडे, ज्योती लांजेवार, शरद, महाडेश्वर प्रज्ञा लोखंडे, सुगंधा शेंडे, डॉक्टर भगवान ठाकूर या मराठी साहित्यिकांनी आंबेडकरी गीतांचे योगदान दिले आहे. मराठीतील आंबेडकरी गीतांचे योगदान पाहता, अनेक गीतकारांनी आंबेडकरांच्या कार्याला उजाळा देणारे गीत रचले आहेत. यातील काही गीतकारांचा उल्लेख येथे करण्यात आला आहे.

**निष्कर्ष:**

१) गीतकारांनी गीतांच्या माध्यमातून समाजाशी संवाद साधून आपले म्हणणे पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे .

२) डॉ आंबेडकरांनी भगवान गौतम बुद्ध संत कबीर आणि म. फुले यांना आपले आदर्श मानले आहे यांच्या विचारांचा प्रभाव आंबेडकरांवर पडला होता त्यामुळे गीतांमधून या सर्वांचे विचार व्यक्त होताना दिसतात.

३) डॉ आंबेडकरांनी जर बहुजनांचे प्रश्न उचलून धरले नसते तर आजही हा समाज मागासलेला राहिला असता असे काही गीतकारांनी त्यांच्या गीतेतून पटवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


१) कटारे मोतीराम, 'फुले- आंबेडकरी प्रेरणेचे नवे कवी नवे आकलन', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००६, पृ. क्र. ३४.

२) सूर्या अनिल, 'आंबेडकरी स्वकथने : एक समाजशास्त्रीय अध्ययन', सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. ऑक्टोबर १९९६ पृ.क्र.२२०.